नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४२ Issue - 242 | वार बुधवार दि. २१ जानेवारी २०२६ Blow- Wednesday Date 21 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दावोसमध्ये १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणूकींचे १९ सामंजस्य करार



## महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दावोस : भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्र गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

राज्य शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकांकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधी मंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

### पंधरा लाख रोजगार संधी, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक

तत्पुर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी महाराष्ट्र सदैव सज्ज आहे. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल.

'उद्योजक - गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घनकचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या रोगजार निर्मितीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय़, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणूकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, चर्चेच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

याशिवाय, कार्लसबर्गचे सीईओ जेकब अँडरसन यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूकीला पोषक वातावरणाचे कौतुक करताना राज्याच्या उद्योग धोरणाला दाद दिली. कंपनी लवकरच भांडवली बाजारात आयपीओ आणण्यासाठी प्रय़त्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कोका-कोला कंपनीचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट मायकेल गोल्टझमन यांच्या समवेत देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गुंतवणुकीच्या अनुषंगाने चर्चा झाली.

# राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाचे केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसमोर सादरीकरण

**पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली राज्य शासनाची भूमिका**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदर्भातील प्रस्तावाचे सादरीकरण केले. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातील पहिले प्राधिकरण ठरणार असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.



या विशेष बैठकीत मंत्री मुंडे यांनी राज्यातील जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वतःची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी व सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णतः प्रदूषणमुक्त करण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल असे मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्राने याबाबत घेतलेल्या पुढाकाराबद्दल विशेष कौतुक केले आणि यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे (एनआरसीडी) संचालक राजेश कुमार, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त अभियानासाठी शिक्षण मंडळ सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी आणि मार्च २०२६ दरम्यान उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) आणि माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) लेखी परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळ सज्ज असल्याचे मंडळाच्या मुंबई विभागीय सचिवांनी कळविले आहे.

इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांमध्ये कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळामार्फत सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. परीक्षेकरिता दक्षता समिती गठीत करण्यात आली असून भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा कशी द्यावी तसेच परीक्षा देताना काय करावे आणि काय करू नये, याबाबतही सूचना देण्यात आल्या असल्याचे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

# बीडच्या जंगलात 'महादेव ॲप'चा आंतरराष्ट्रीय अड्डा! मध्यरात्री पोलिसांचा छापा; कोट्यवधींची उलाढाल उघड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड: नेकनूरपासून अवघ्या अकरा कि. मी. अंतरावर असलेल्या कारेगव्हाणमध्ये लाखो रुपयांची उलाढाल करणारा ऑनलाईन सट्टा सुरु असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांच्या आदेशावरून बीड मुख्यालयातील दोन पोलिसांनी मध्यरात्री एक ते दोन वाजण्याच्या सुमारास कारेगव्हाण परिसरात छापा मारला असता लोटस ऑनलाईन गेमद्वारे सट्टा सुरु असल्याचे उघडकीस आले. या वेळी १५ मोबाईलसह बार लॅपटॉप जप्त करत चौघा जणांना जेरबंद केले.

मोबाईल आणि लॅपटॉपच्या प्राथमिक तपासणीत या सर्व खेळात कोट्यवधी रुपयांचे बेकायदेशीर आर्थिक व्यवहार झाल्याचे सांगण्यात येते. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया नेकनूर पोलीस ठाण्यात सुरू होती. ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या प्रमानात सट्टा खेळला जात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून कारेगव्हान परिसरामध्ये लोटस ऑनलाईन गेमच्या माध्यमातून सट्टा चालवला जात होता. याची माहिती बीड मुख्यालयाच्या दोन पोलिसांना झाली. त्यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती देत मध्यरात्री कारेगव्हाण परिसरातील जंगलसदृश्य ठिकाणी एका कोपीत छापा मारला. त्या वेळी कंधारे नावाचे तीन आणि खिल्लारे नावाचा एक असे चौघे त्याठिकाणी महादेव ॲप लोटस द्वारे ऑनलाईन सट्टा चालवत होते.

**शक्य तिथे घड्याळ, शक्य तिथे तुतारी**

**जुन्नरमध्ये दोन्ही राष्ट्रवादी घडाळ्यावर लढणार तर आंबेगावात तुतारी वि. घड्याळ लढत**

# जिल्हा परिषदेसाठी दोन्ही राष्ट्रवादीतील अंडरस्टँडिंग निर्णायक वळणावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस या पक्ष चिन्हांचा सोयीनुसार वापर करण्यात येणार आहे. जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथे ते चिन्ह वापरून उमेदवार उभे केले जाणार आहेत. महापालिका निवडणुकांनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या (छउझ श्रश्रळरपलश) नेत्यांनी एकत्र बैठक करुन ही स्ट्रॅटेजी ठरवली आहे. पुणे जिल्ह्यात आणि राज्यातील इतर जिल्ह्यांमधे देखील घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस अशा दोन्ही चिन्हांवर राष्ट्रवादीचे उमेदवार निवडणूक लढणार आहेत.

एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधील चिन्हाची लढाई सर्वोच्च न्यायालयात निर्णायक टप्प्यावर पोहोचलेली असताना दुसरीकडे दोन पक्षांमधील अंडरस्टँडिंग देखील निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचं चित्र आहे. त्यामुळं न्यायलयाचा निकाल कुणाच्याही बाजूने लागो, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसनी महापालिकेप्रमाणे जिल्हा परिषदांच्या निवडणुका देखील एकोप्याने लढवण्याचा निर्णय घेतलाय.

**जुन्नरमध्ये दोन्ही राष्ट्रवादी घडाळ्यावर लढणार**

जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथं ते चिन्ह वापरण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार घड्याळ या एकाच चिन्हावर लढणार आहेत आणि या उमेदवारांची जबाबदारी तुतारीच्या चिन्हावर खासदार म्हणून निवडून आलेल्या डॉ.



अमोल कोल्हेंवर असणार आहे. जुन्नर तालुक्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनचं आव्हान असल्याने हा निर्णय घेण्यात आलाय.

**आंबेगावात तुतारी वि. घड्याळ लढत**

शेजारच्या आंबेगाव तालुक्यात घड्याळ आणि तुतारीचे उमेदवार एकमेकांच्या विरोधात लढणार आहेत. दिलीप वळसे पाटील यांच्या विरोधात तुतारीकडून निवडणूक लढवणाऱ्या देवदत्त निकमांमध्ये समेट होऊ न शकल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे दोघांपैकी कोणाचीही सरशी झाली तरी फायदा राष्ट्रवादीचाच होणार आहे.

महापालिका निवडणुकीवेळी देखील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी समन्व्य राखत उमेदवार दिले होते. पुणे महापालिकेचा जो भाग सुप्रिया सुळेंच्या बारामती लोकसभा मतदारसंघात येतो आणि जो भाग अमोल कोल्हेंच्या शिरूर लोकसभा मतदारसंघात येतो त्या भांगामध्ये तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांवर उमेदवार उभे करून त्यांना निवडणून आणण्यात आले. एका अर्थाने तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाचे अस्तित्व कायम राहील याची खबरदारी घेण्यात आली.

महापालिका निवडणुकीवेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये आघाडी केली. तरीही भाजपच्या आव्हानाचा दोन्ही पक्ष सामना करू शकले नाहीत. दोन्ही ठिकाणी झालेल्या दारुण पराभवाने दोन्ही पक्षातील नेत्यांना आणखीन जवळ आणल्याचं चित्र आहे. मात्र, अजित पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे मात्र दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याबद्दल वेगळा सूर आळवत असल्याचं बोललं जातंय.

जिल्हा परिषदेच्या निवडणुका पार पडल्या की महाराष्ट्रात २०२९ पर्यंत कोणत्याच महत्त्वाच्या निवडणुका होणार नाहीत. अशावेळी एकीकडे अजित पवार सत्तेत राहून सत्तेचे फायदे घेण्याचा प्रयत्न करताना दिसतील, तर दुसरीकडे रोहित पवार आणि इतर नेते विरोधच राजकारणही करू शकतील. त्यामुळं दोन पक्षांचं स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवणं पवारांच्या राजकारणासाठी फायद्याचं ठरू शकतं.

**भाजपला कितपत चालणार?**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासूनच या पक्षाच्या सुभेदारांना सत्तेची उब मिळत राहिली. त्यामुळे जेव्हा विरोधात बसायची वेळ आली तेव्हा हे सुभेदार संघर्षात कमी पडले. त्यामुळं शरद पवार भाजपशी दोन हात करत असताना सत्ता भोगलेले त्यांचे सुभेदार मात्र त्यांना सोडून भाजपच्या वळचणीला गेले. आता शरद पवारांच्या पक्षालाच अस्तित्वासाठी सत्तेची उब गरजेची वाटतेय. त्यातून अजित पवारांशी जुळवून घेण्यात आलायं. अर्थात भाजपच्या नेतृत्वाला हे दोन्ही डगरींवर पाय ठेवणं कितपत चालेल हे लवकरच कळेल.

## संपादकीय....

### राज्याची भरारी

भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्र गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत. राज्य शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकांकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधी मंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

# नळदुर्ग नगर परिषदेच्या गटनेते पदाची सूत्रे हाती मिळताच मारुती खारवे यांनी येथील प्रत्येक प्रभागातील अस्वच्छतेकडे लक्ष केंद्रित करून केली स्वच्छतेची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


वागदरी/एस. के.गायकवाड : मानवी आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची बाब असून सध्या नळदुर्ग शहरात प्रत्येक प्रभागात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याचे दिसून येत आहे तेंव्हा नगरपरिषदेने नळदुर्ग शरातील प्रत्येक प्रभागातील अंतर्गत गटारी,रस्ते स्वच्छ करून येथील मानवी आरोग्यास होणारा संभाव्य धोका टाळावा अशी मागणी नळदुर्ग नगर परिषदेचे नूतन नगर सेवक तथा विरोधी पक्ष गट नेते मारूती खारवे यांनी लेखी निवेदनाद्वारे संबंधित मुख्याधिकारी यांच्या कडे केली आहे.

नळदुर्ग नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनात त्यांनी म्हटले आहे की गेल्या दोन महिन्यापासून नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाचे येथील सर्व प्रभागातील स्वच्छतेच्या दृष्टीने दुर्लक्ष होत असून प्रत्येक प्रभागात काही ठिकाणी गटारी तूंबलेले असून त्या स्वच्छ केलेल्या नाहीत त्यामुळे घाण सांडपाणी रस्त्यावर येऊन घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारली जात नाही अशी तक्रार नागरिकांतून होत आहे.ज्या संस्थेला स्वच्छतेचे टेंडर मिळाले आहे त्या संस्थेने शहरातील प्रत्येक प्रभागातील तुंबलेल्या गटारी व रस्ते स्वच्छ करून कचरा वेळच्यावेळी उचलून शहरात प्रत्येक प्रभागात स्वच्छता ठेवून येथील मानवी आरोग्यास होणारा संभाव्य धोका टाळावा अशी मागणी त्यांनी लेखणी केली आहे.










# इंग्रजी ही देश विदेशातील माणसे जोडणारी भाषा

### प्रा. डॉ. दीपक ननवरे यांचे प्रतिपादन; कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इंग्रजी भित्तिपत्रकाच्या प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आधुनिक जगात प्रभावी आणि व्यापक संवादाची भाषा म्हणून इंग्रजी भाषा ओळखली जाते विविध देशांतील लोकांना एकमेकांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंग्रजी भाषेने केले आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा ही जागतिक एकात्मतेचे प्रतीक बनली आहे. असे प्रतिपादन दयानंद महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ दीपक ननवरे यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या इंग्रजी भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ सुरेश ढेरे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रा डॉ अनिलकुमार वावरे, संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्रा डॉ विरभद्र दंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

डॉ दंडे म्हणाले की, उच्च शिक्षण, संशोधन, स्पर्धा परीक्षा तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक असते. अनेक महत्त्वाची पुस्तके, संदर्भ साहित्य आणि संशोधन कार्य इंग्रजी भाषेत उपलब्ध असल्यामुळे ज्ञानसंपादन अधिक सुलभ होते. इंग्रजी भाषा शिकल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

प्राचार्य डॉ ढेरे म्हणाले की, करिअरच्या दृष्टीने बहुराष्ट्रीय कंपन्या, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र, माध्यमे, पर्यटन आणि सेवा क्षेत्रात इंग्रजी संवाद कौशल्याला मोठी मागणी आहे.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांनी केले, आभार समर्थ पवार यांनी मानले.

भित्तिपत्रकामध्ये संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन जगप्रसिद्ध इंग्रजी लेखकांचे कार्य संकेत पुजारी,

रविराज कुलकर्णी, समर्थ पवार, पंचप्पा जाधव, पवन अंबुरे, आकाश कोकरे, शकुंतला कोरे, पायल कांबळे यांनी अधोरेखित केले.

**विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचे ज्ञान अवगत करावे.**

तंत्रज्ञान आणि डिजिटल युगात इंटरनेट, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच जगातील घडामोडी समजून घेण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत केली पाहिजे. असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# संशोधन प्रकल्पांचा उपयोग समाजासाठी व्हावा : उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'आज विज्ञान हा दैनंदिन जीवनशैलीचा एक भाग बनलेला आहे. आपल्या ज्ञानात विज्ञानामुळे अधिक भर पडत असते. विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जर बदलला तर जीवनात सकारात्मक येते आणि चिकित्सक वृत्ती, जिज्ञासू वृत्ती वाढीस लागते आणि मग आपल्यामधूनच शास्त्रज्ञ, उद्योजक घडत असतात. म्हणून आपल्या संशोधन प्रकल्पांचा समाजासाठी उपयोग व्हावा तरच आपल्याला त्यातून आनंद घेता येईल.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी केले.



राज्य विज्ञान संस्था, रविनगर, नागपूर व शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये आयोजिलेल्या

### स्वेरीत 'बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनी २०२५-२६' चा समारोप

'५३ व्या सोलापूर जिल्हा स्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनी २०२५-२६' च्या समारोप प्रसंगी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार ह्या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रकाश नांगरे हे होते. महाराष्ट्र राज्य विज्ञान महामंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते यांनी प्रास्ताविकात 'स्वेरीमध्ये आयोजिलेल्या विज्ञान व गणित प्रदर्शनासंबंधी माहिती दिली. प्रदर्शनाच्या दोन दिवसात अगदी खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले. त्यांना या काळात कोणतीही अडचण आली नसून उत्तम सोय केल्याबद्धल त्यांनी समाधान व्यक्त केले. या प्रदर्शनातून प्राथमिक गटात प्रथम- बसवराज रविकांत तोळनुरे (प्रकल्प- सौर कृषी पंप), द्वितीय-विरोचंद सिद्धेश्वर कराळे (हॅन्ड डेस्टर कार), तृतीय- प्रेमराज आण्णासाहेब शेळके (ट्रान्समिशन लाईन), माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून प्रथम -महेश श्रीमंत टेंगळे (स्मार्ट ॲग्रिकल्चर), द्वितीय- आयुब चारुदत्त लाड (स्मार्ट स्कूल) व तृतीय- जुनेद बाग्दावर शेख (ऊमन सेफ्टी अँड मल्टीपर्पज सेफ्टी), दिव्यांग गटातून प्राथमिक गटात प्रथम- सुप्री गजेंद्र शिंदे (जल, संधी, व्यवस्थापन), दिव्यांग गटातून माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात प्रथम- गणेश महादेव निकम (अंडी उबवणे मशीन), प्राथमिक शिक्षक गटात प्रथम- विशाल विष्णुदास रेपाळ (माझी गणित शाळा), माध्यमिक शिक्षक गटात प्रथम- मंगेश अरविंद सोनटक्के (खेळातून जीएसटी आणि कृतीयुक्त आराखडा), योगशाळा व परिचर गटात प्रथम- शशिकांत हनुमंत शेंडे (निर्मिती वैज्ञानिक संकल्पना स्पष्टीकरण पूरक वैज्ञानिक व शैक्षणिक सहल) हे विद्यार्थी व शिक्षक विजेते ठरले असून त्यांची निवड राज्य पातळीवर झाली आहे. परीक्षकांना हे नंबर काढण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागली.

प्रा. शितल पाटील, प्रा. एस. डी. माळी, प्रा. एस. एस. गायकवाड, प्रा. पी.बी. लोखंडे, डॉ. एस. डी. भोसले, आदींनी परीक्षकांचे काम उत्तमरित्या पहिले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी गायत्री गणेश गावंधरे व राष्ट्रमाता कन्या इंदिरा कन्या प्रशाला मोहोळचे सहशिक्षक औदुंबर मुळे यांनी स्वेरीतील दोन दिवस आलेला अनुभव सांगितला. ते म्हणाले, 'या दोन दिवसांमध्ये स्वेरी कॅम्पस मध्ये 'गैरसोय' हा शब्द रजेवर गेला होता. परीक्षक प्रा. शितल पाटील म्हणाल्या की, 'या प्रदर्शनाद्वारे बालवैज्ञानिकांना सुंदर व्यासपीठ मिळाले असून शाश्वत भारत घडविण्यासाठी हे उत्तम व्यासपीठ निर्माण केले आहे' अशी भावना व्यक्त केली. अध्यक्षस्थानावरून बोलताना उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे यांनी प्रदर्शनामध्ये सहभाग घेतलेल्या सर्व बालवैज्ञानिकांचे कौतुक केले ते म्हणाले 'जे विजेते ठरले ते मोलाचे आहेत आणि जे उपयोविजिते ठरले ते देखील लाख मोलाचे आहेत. त्यामुळे पुरस्कार मिळाला नाही म्हणून नाराज न होता प्रकल्पामध्ये आणखी जोमाने संशोधन करावे.' असे सांगून चिमुकल्या हातांनी सादर केलेल्या कल्पक बुद्धिमत्तेचे कौतुक केले. यावेळी स्वेरीतील विज्ञान प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतलेल्या विज्ञान मंडळातील सर्व सदस्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्राथमिक , माध्यमिक व शिक्षक गटातून तब्बल १३२ प्रकल्पांचे सादरीकरण केले गेले. यामध्ये बालवैज्ञानिकांमधून अद्भुत, बौद्धिक कल्पनांचे विशेष संशोधन आढळले तर हे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती. सोलापूर जिल्हा विज्ञान मंडळातील सदस्यांनी उत्कृष्ट परिश्रम करून हे प्रदर्शन यशस्वी केले. यावेळी जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष व समन्वयक संजय भस्मे, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू चव्हाण, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष व सहसमन्वयक संजय जवंजाळ, नीलकंठ लिंगे, वरिष्ठ लिपिक मनोज साबळे, एस. डी. माळी, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू चव्हाण, सहनिरीक्षक अनिल बनसोडे, विज्ञान मंडळाचे पदाधिकारी, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, प्रा. ए.एस. भातलवंडे आदी प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश लटके यांनी केले तर विद्यार्थ्यांना पुरस्कार देवून या उपक्रमाची सांगता करण्यात आली.

### पंधरा दिवसात दहा लाख भाविक श्री मतोबा महाराजाच्या चरणी नतमस्तक : देवस्थान ट्रस्ट

# श्री मतोबा महाराज यात्रोत्सवाची उत्साहात सांगता

निफाड/प्रतिनिधी : लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व नैताळे ग्रामस्थांचे अराद्य दैवत श्री मतोबा महाराज यात्रोत्सवास ३ जानेवारी रोजी उत्सहात प्रारंभ झाला. यांत्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी देवस्थान ट्रस्टच्या वतीने महापुजा व रथ पुजाअशा धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर रथ मिरवनुकीस प्रारंभ करण्यात आला रथाची मिरनुक दुपारी ३ वाजेपर्यंत सुरु होते हा यात्रोत्सव १८ जानेवारी पर्यंत अखंड सुरु होता या १५ दिवसाच्या कालखंडात जवळपास १० लाख भाविक श्री मतोबा महाराजांच्या चरणी नतमस्तक झाल्याची माहीती देवस्थान ट्रस्टने दिली आहे.

नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या नैताळे येथे दरवर्षाप्रमाने याही वर्षी पौष पोर्णिमेला श्री मतोबा महाराज यांचा यात्रोत्सव भरविण्यात आला होता हा उत्सव अखंड १५ दिवस सुरु होता.

**यात्रोत्सवाच्या १५ दिवसाच्या कालखंडात निफाड पोलिसानी अतिशय चोख बंदोबस्त ठेऊन महामार्गावरील वाहतुक सुरळीत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.नैताळे प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व आरोग्य टीम कार्य तत्पर राहुन यात्रा कालावधीत कुठलीही रोगराई पसरऊ दिली नाही व भाविकांच्या आरोग्याची वेळोवेळी काळजी घेतली.ग्रामपंचायत सरपंच निशा पाठक ,उपसरपंच मोतीराम भवर ,ग्रामविकास अधिकारी उज्वला भोईर व सदस्य मंडळ यांच्या सुचनेनुसार व्यावसायिकाना,भाविकांना,ग्रामस्थाना वेळोवेळी रस्ते,पाणी,स्वच्छता उपलब्ध करुन देण्यात आली.यात्रोत्सवात सहभागी असणाऱ्या सर्व घटकानी देवस्थान ट्रस्ट व ग्रामपंचायत व्यावस्थापनास वेळोवेळी मदत केली त्या बद्दल सर्वांचे मनापासुन आभार..!**

**– गायत्री बोरगुडे**
**अध्यक्षा– यात्रा कमेटी,**
**ग्रामपंचायत, नैताळे**

यात्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी पहाटे ५ वाजता भागवताचार्य ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली शिंदे, सुनिल जैन,.भारती जैन तसेच दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाग्यवान भाविक म्हणून प्रविण पाटील, अनिता पाटील यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांच्या नविन चांदीच्या मुर्तीची महापुजा करण्यात आली. तर सकाळी ९ वाजता बोकडदरे येथील भारत माता आश्रमाचे महंत श्री महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज व रथाचे मानकरी मोहन खापरे यांच्या हस्ते रथ मिरवनुकीस प्रारंभ करण्यात आला होता.यावर्षी रथ मिरवनुकीस प्रारंभ करताना रथाला पहिली बैलजोडी जुंपण्याचा मान सिन्नर तालुक्यातील भाटवाडी येथील शेतकरी नंदकिशोर महात्मे यांना देण्यात आला होता. भाविकांचे दर्शन सहज सुलभ व्हावा म्हणून दर्शन रांगेची व मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती.मंदीर परिसरात अनेक प्रसादव्यावसायिकांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली होती.मंदिरावर आकर्षक विद्युत रोषनाई करण्यात आली होती.मंदिर व परिसरात गर्दीच्या नियंत्रणासाठी स्वयमसेवकाच्या नेमनुका केलेल्या होत्या.भाविकांना पिण्यासाठी शुध्द पाण्याची व्यवस्था केली होती. नारळ फोडण्यासाठी मशिनची व्यवस्था करण्यात आली होती.यात्रा



कालावधीत दररोज सकाळी ६ वाजता ,दुपारी १२ वाजता व संध्याकाळी ७ वाजता संगितबध्द आरतीचे नियोजन करण्यात आले होते.यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवसी.जिल्ह्यातील अनेक नामवंत बॅन्ड पथकानी यात्रोत्सवास हजेरी लाऊन आपआपली वाद्यकला सादर केली यात्रोत्सवात सर्व जीवनावश्यक वस्तुची दुकाने थाटलेली होती. लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई जगताप यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांची महाआरती करुन यात्रोत्सवाची सांगता करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर शहरामध्ये गुढ आवाजाने नागरिक भयभीत

## नागरिकांमध्ये उत्सुकता अन् भीतीचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर ते पुणे : पंढरपूर शहरांमध्ये गेल्या दोन दिवसापासून जोर जोरात गुढ आवाज मात्र हा आवाज कशाचा आहे अशी माहिती नागरिकांना होत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे.

पंढरपूर शहरांमध्ये गेले दोन दिवस सकाळी दहा व दुपारी दोन वाजता आ-वाजामुळे घराच्या खिडक्या हादरत आहेत. आवाज कशाचा आहे याची माहिती नागरिक एकमेकांना करत आहे. असा आवाज येत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पंढरपूर शहरामध्ये मंगळवारी दहा वाजता असा आवाज झाला आहे त्यामुळे



नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसर-लेले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये उत्सुकता व भीतीचे वातावरण पसरलेले आहे. या आवाजाबाबत सोशल मीडिया वरून ही चर्चा होत आहे. प्रशासनाकडून हा कशाचा आवाज आहे याच्यावरून कोणताही खुल-ासा करण्यात येत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे असे दिसून येत आहे. पंढरपूर मंगळवेढा सांगोला या ठिकाणी अशा प्रकारचा आवाज आले असल्याची नागरिकांमधून चर्चा होत आहे. कशाचा आवाज आहे याची प्रशासनाने लावावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# नूतन नगरसेवक प्रवीण गायकवाड यांचा नळदुर्ग येथे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे नगर नळदुर्ग तालुका तुळजा-पूर येथील लहुजी शक्ती से-नेचे युवा कार्यकर्ते प्रवीण धनराज गायकवाड यांची नुकतच नळदुर्ग नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे नगर येथे जाऊन नळदुर्ग नगर परिषदेचे गटनेते तथा सामाजिक कार्यकर्ते मारुती खारवे, महिला व बालकल्याण समितीचे सदस्य सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार दयानंद काळुंके रिपब्लिकन पार्टी ऑफ इंदिया (आठवले ) पक्षा-चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के. गायकवाड आदींनी त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.




याप्रसंगी बोलताना एस.के. गायकवाड महाले की, नगरपरिषद स्थापनेपासून ते आज तागायत मातंग समाजाला नगर परिषदेम ध्ये प्रतिनिधित्व मिळाले नव्हते परंतु लहुजी शक्ती सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष शिवाजी गायकवाड यांच्या संघर्षमय लढातून सामाजिक चळवळ सुरू आहे त्यांच्या या संघर्षमय चळवळीचे आणि सम ाजाच्या एकजुटीचे फलित म्हणून आज प्रवीण गायकवाड यांना नळदुर्ग नगर परिषदेमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून सभागृहात प्रवेश करण्याची संधी मिळाली आहे. ही एक फार मोठी अभिनंदन आणि प्रेरणादायी अशी बाब असून प्रवीण गायकवाड हे नगरपरिषदेमधील सर्वात तरुण नगरसेवक म्हणून ओळखले जातात. यावेळी लहुजी शक्ती सेनेचे नेते शिवाजी गायकवाड, जेष्ठ कार्यकर्ते धनराज गायकवाड सह युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल सावंत जिल्हा परिषद निवडणूक लढवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते श्री अनिल सावंत हे मंगळवेढा तालुक्यातील बोसे घाटातून जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे.



श्री अनिल सावंत यांचा मंगळ तालुक्यामध्ये साखर कारखाना आहे. त्यांचे शेतकऱ्यांचे सर्वत्र चांगले संबंध निर्माण झालेले आहेत. तसेच साखर कारखान्याची २०० ऊन अधिक कामगार आहेत. त्यामुळे त्यांनी नवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यांनी मंगळवेढा विधानसभा म तदारसंघातून निवडणूक लढवली आहे. त्यामुळे त्यांचा मतदाराशी चांगला संबंध असल्याची दिसून येत आहे. याचा फायदा त्यांना जिल्हा परिषदेच्या निवडणूक मध्ये अशी चर्चा भुशी गटातून होत आहे. अनिल सावंत यांचे विरोधी गटाबरोबर नेत्यांशी चांगले संबंध आहेत. त्यांना यांचा फायदा होणार आहे व त्यांनी भोसे गटातून निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे.

# न्या. रानडे जयंती महोत्सव निमित्त आयोजित विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेच्या वतीने न्या रानडे जयंती महोत्सव निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ वैनतेय विद्यालयात संपन्न झाला.

यापसंगी अध्यक्षस्थानी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. अशोक सोनवणे ,येवल्याच्या समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे, जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष शिवाजी ढेपले, संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले, संस्थेचे विश्वस्त ॲड दिलीप वाघवकर, मधुकर राऊत, विश्वास कराड , प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य




सुभाष खाटेकर पर्यवेक्षक बी.बी ुरे, .गुंजाळ,श्रीमती आर एम लाहोटी, वैनतेय प्राथमिक विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सुजाता तनप- ,वैनतेय शिशुविहारच्या पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रारंभी सरस्वती माता आणि न्या रानडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यानंतर वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी श्री गणेश वंदना सादर केली कार्यक्रम ाचे प्रास्तविक रतन पाटील वडघुले यांनी केले प्रमुख अतिथींचा परिचय उपप्राचार्य सुभाष खाटेकर यांनी करून दिला.

न्या रानडे जयंती निमित्त वैनतेय विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पाक कला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा व इतर स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली

यापसंगी प्रा अशोक सोनवणे यांचे न्या रानडे आणि त्यांचे जीवन कार्य या विषयावर व्याख्यान झाले

यापसंगी ,प्रा अशोक सोनवणे, वि.दा व्यवहारे ,अर्जुन कोकाटे यांची भाषणे झाली सूत्रसंचालन संदीप चकोर व श्रीमती भारती लंबाते यांनी तर आभार प्रदर्शन विश्वास कराड यांनी केले

# आदर्श प्राथमिक विद्यालय बाजार डे उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आदर्श प्राथमिक विद्यालय बाजार डे हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने पार पडला. शाळेच्या प्रांगणात रंगीबेरंगी सजावट विविध प्रकारचे खाद्यपदार्थ हस्तकला वस्तू आणि खेळण्याचे स्टॉल्स उभारण्यात आले होते.



राव उपक्रमामध्ये शाळेतील पाचवी विद्यार्थ्यांनी ढोकळा, भेळ, शिवपुरी, असे गोड गोड पदार्थ सरबत अधिक खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले. काही विद्यार्थ्यांनी हस्तकला वस्तू पुस्तकांची बुकमार्क सजावटीच्या वस्तू आणि छोट्या खेळण्याचे विक्री केली व पालक शिक्षक तसेच स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत या उपक्रम ाला उत्तम प्रतिसाद दिला व या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी सर्व काम स्वतःच्या प्रयत्नाने केले ट्रान्स सजवले वस्तूंची विक्री करणे ग्राहकांची संवाद साधने पैशाची देवाण-घेवाण संबंधित पार पाडणे अशा सर्व गोष्टी विद्यार्थ्यांनी शिकल्या. त्यामुळे त्यांना उद्योजकांचा व स्वावलंबनाचा आणि व्यवस्थापनाचा महत्त्वाचा अनुभव मिळाला व शाळेचे मुख्याध्यापिका सौघंटी बाई व आपल्या भाषणात म्हणाले की विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी शिक्षण नको तर व्यवहारीय जीवनातील आवश्यक असलेल्या गोष्टी शिकवल्या हव्यात या बाजारडे सारख्या उपक्रमामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढल्याने गणिती कौशल्य साधारणता संवाद कौशल्य व्यवहार ज्ञान आणि सहकार्याची भावना ही सुद्धा विकसित होते.

समाजसेवक मुजमिल कमली वाले, या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की अशा उपक्रमामुळे मुलांमध्ये उद्योगशील वृत्ती निर्माण होते आणि मुलांना प्रत्यक्ष व्यवहारात शिकण्याची संधी मिळते यासाठी सर्व शिक्षक ऐश्वर्या कुलकर्णी, लक्ष्मी बोडके, सानिका कुलकर्णी, तृप्ती वाटरकर तसेच शितल होनराव, सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

# एल ई डी हेडलाईटमुळे वाहनचालक हैराण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/राजेंद्र थोरात : सध्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वापरात आलेल्या एल ई डी हेडलाईटमुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असुन. विशेषतः रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांच्या तीव्र एल ई डी प्रकाशामुळे डोळ्यांवर अच-ानक ताण येतो. काही क्षणांसाठी दृष्टी धूसर होऊन अपघात होण्याची शक्यता वाढत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे.

पूर्वीच्या पिवळसर प्रकाशाच्या तु-लनेत सध्याच्या एल ई डी हेडलाईटचा उजेड अधिक तीव्र आणि थेट डोळ्यांवर पडणारा आहे.... त्यामुळे दुचाकीस्वार, पादचारी तसेच ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

वाहनचालकांच्या मते, समोरून येणाऱ्या वाहनाचा एल ई डी प्रकाश इतका तीव्र असतो की काही सेकंद रस्ता दिसेनासा होतो. अशा परिस्थितीत अचानक ब्रेक मारणे किंवा वाहनाचा ताबा सुटण्याचे प्रकार घडत आ-हेत. यामुळे किरकोळ तसेच गंभीर अपघातांचे प्रमाण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे....

त्यामुळे वाहतूक पोलिसांनी एल ई डी हेडलाईटच्या वापराबाबत कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

जर वेळीच या समस्येकडे लक्ष दिले नाही, तर एल ई डी हेडलाईटचा हा वाढता त्रास भविष्यात गंभीर अपघातांना कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरीकांम धुन बोलले जात आहे.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १५३ वी शतकोत्तर वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

# अज्ञानी जनतेला जागृत करून सज्ञानी बनविणे, हे आपले उद्दिष्ट असावे : बी. बी. मेश्राम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने मी लोकशाहीचा पाठीराखा असून कोणत्याही आकारात आणि पद्धतीत असलेल्या एखाधिकारशाहीचा विध्वंसक आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गोलमेज परिषदेतील विधानाच्या ९४ व्या वर्धापन दिनानिमि त्त सदरील ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर १५३ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे १८ जानेवारी २०२६ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, १९ जानेवारी १९३१ ला गोलमेज परिषदेत बोल-ताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले होते की, एखाद्या देशाच्या राजकीय जीवनाचे सुसूत्रीकरण करण्याचे प्रयत्न करीत असताना उत्तरदायी शासन आणि प्रातिनिधिक सरकार या दोन बाबींना प्राथमिकता दिली पाहिजे. कुठल्याही देशातील जनतेवर राज्य करीत असताना जनतेला दारिद्र्यात ठेवून राज्य करणे आणि जनतेला दारिद्र्यातून बाहेर काढून राज्य करणे या दोन भिन्न बाबी आहेत. म्हणून जनतेने सभागृहात सक्षम प्रतिनिधी पाठविले पाहिजेत आणि त्या पुढार्यावरती जनतेने करडी नजर ठेवली पाहिजे. हे करण्यासाठी अज्ञानी जन-तेला जागृत करून सज्ञानी बनविणे हे आपले उद्दिष्ट असायला हवे. करिता समग्र आंबेडकरवाद जनमानसावर बिंबविला पाहिजे. कुटुंब हा समाजा-चा प्रमुख घटक असल्यामुळे ज्याची सुरुवात आपण आपल्या कुटुंबापासून केली पाहिजे. लोकशाहीची स्पष्टता कुटुंबातील सदस्यांना यावी म्हणून कुटुंबात संसदीय प्रणाली राबविली पाहिजे. समतायुक्त मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी देशव्यापी परिवर्तनवादाची चळवळ चाल-वीत असताना दक्षिण भारतात होऊन गेलेल्या आदर्शांना उत्तर भारतात तर उत्तर भारतात होऊन गेलेल्या आदर्शांना दक्षिण भारतात प्रचारीत आणि प्रसारित केले पाहिजे. तसेच २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या लाल लायब्ररीम ध्ये दिलेल्या संदेशात या देशांमध्ये संसदिय लोकशाही टिकवायची असेल तर कुठल्या अटी आणि शर्ती यांचे पालन केले पाहिजे हे स्पष्ट केलेले आहे. त्याचे आपण अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून भारतीय नागरिकांचे परिवर्तनवादाच्या अनुषंगाने जनमत तयार होऊ शकेल. या बाबीचे समाज जीवनात संचलन व्हावे, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मी लोकशाहीचा पाठीराखा असून कोणत्याही आकारात आणि पद्धतीत असलेल्या एकाधिकारशाहीचा विध्वंसक आहे, असे म्हटले हो-ते. याची जनतेला प्रचिती यावी म्हणून आपण या प्रासंगिक विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे समन्वयक उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, नुकत्याच संपन्न झालेल्या निवडणुकीत बिनविरोध प्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेवरून असं लक्षात येते की येणाऱ्या लोकसभेमध्ये सुद्धा खासदार बिनविरोध निवडून पाठविले जातील की काय? अशी शंकास्पद परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपल्यातील काही नेते मंडळी शत्रू सोबत हात मिळवणी करून चळवळीचे नुकसान करून घेत असतात. याची जाणीव ठेवून आपण म ार्गक्रमण केले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना ॲड. सुनील कुमार नागवंश म्हणाले की, ब्रिटिशांनी आपल्यावर राज्य केले असले तरी त्यांनी आपणास शिक्षणाची द्वारे खुली करून मानवी हक्क अधिकाराची जाणीव करून दिलेली आहे. या देशाला न्याय देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरच करू शकतात, याची जाणीव असल्यामुळे ब्रिटिशांनी त्यांना गोलमेज परिषदेत बोलावले होते. ज्यात आंबेडकरांनी आपले म्हणणे सभागृहाला पाठवून दिले ज्याला केवळ गांधींनी विरोध केला होता. परिणामी पुणेकरारातील तडजोडीनुसार स्वतंत्र मतदार संघाऐवजी नाईलाजाने संयुक्त मतदार संघ पद्धती स्वीकारावी लागले. करिता शिकल्या सवरलेल्या व्यक्तींनी राजकारणाकडे दुर्लक्ष करू नये.

यापसंगी महादेव डांबरे म्हणाले की, आपण साउथ बरो व सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदेतील कार्यवाही समजून घेतली पाहिजे. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, चळवळीसाठी संसाधने उपलब्ध करून दिली पाहिजेत. ड. आर. एम. गायकवाड म्हणाले की, समाजा-तील कुठल्याही घटकाला दुर्लक्षित न करता सर्व वयोगटासाठी कार्यशाळा आयोजित केल्या पाहिजेत. कुटुंब हाच लोकशाहीचा प्रमुख घटक आहे. प्रा. डॉ. ए. आर. केवटे म्हणाले की, आपले विचार आणि आचरण हे पारदर्शक असावे. शासन प्रशासनावर परिणाम करणारी व्युहरचना असावी. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कृतीतून लोकशाहीचा पाठीराखा घोषित करताना एकाधिकारशाहीचा विध्वंसक असल्याचे सिद्ध केले. ॲड. विलास रामटेके म्हणाले की, चर्चेशिवाय निर्णय घेणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटणे होय.

यापसंगी प्रा. शिवम गायकवाड यांचीही विशेष उपस्थिती लाभली होती. सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. ॲड. विलास रामटेके यांनी सूत्रसंचालन तर प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी व आभार प्रा. शिवम गायकवाड यांनी व्यक्त केले.

# कळंब येथे मानवी हक्क अभियानाचा मोर्चा

## अनुष्का पाटोळे प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या मातंग समाजातील अनुष्का पाटोळे या मुलीच्या संशयास्पद मृत्यूची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी कळंब येथे मानवी हक्क अभियानच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला.



कर्मवीर अ‍ॅड. एकनाथ आ-वाड यांच्या जयंतीचे औचित्य साधून मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर वीर सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण, राजमाता जिजाऊ चौक व अण्णा भाऊ साठे यांच्या चौकास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तहसील कार्यालयावर मोर्चा पोहोचला असता हलगीच्या गजरात अनुष्का पाटुळे हिला न्याय मिळालाच पाहिजे अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी अनुष्का पाटोळे च्या संशयास्पद मृत्यूची निष्पक्ष चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा द्यावी, पाटोळे कुटुंबाचे लातूर येथे पुनर्वसन करण्यात यावे, तसेच कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नौकरी देण्यात यावी आदी मागण्यांचे निवेदन प्रशासनास सादर करण्यात आले.

हा मोर्चा मानवी हक्क अभियानचे मराठवाडा अध्यक्ष भाई बजरंग ताटे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महार-ाज आडसुळ, जिल्हाध्यक्षा सौ. माया शिंदे, मानव अधिकार आंदोलन चे हनुमंत पाटुळे, जुलेखा शेख,शंकर ताटे, रणजित कसबे, नवनाथ भंडारे, बापू मेजर, सतपाल बनसोडे, मोहन कसबे, विनोद चव्हाण, विठ्ठल ताटे, किरण गायकवाड, नागनाथ खंडागळे, शंकर लोढे, धनंजय ताटे, विकास गायकवाड, ईश्वर ताटे, अविनाश ताकतोडे, अनिल गायकवाड, सुनील गायकवाड, किसन कांबळे यांच्या सह तालुक्यातील समाजबांधव सहभागी झाले होते.

# ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीच्या महिला जिल्हाध्यक्षपदी वर्षाताई इंगळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सामाजिक क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेले बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बीबी येथील माजी पंचायत समितीच्या सभापती सौ वर्षाताई सुनिल इंगळे यांची भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन द्वारा संचलित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या महिला बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे , सदर राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब केदारे 'व राष्ट्रीय सचिव डॉ अविनाश झोटिंग यांनी दिनांक १९ जानेवारी रोजी सदर निवड पत्र देऊन निवड केली आहे , ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती संपूर्ण देशभरात कार्यरत असून ज्या ज्या ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होते त्या



फसवणूक झालेल्या ग्राहकांना न्याय व त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सदर समिती कार्यरत आहे. निवड झाल्याबद्दल वर्षा इंगळे यांनी सांगितले की यांनी सांगितले की बुलढाणा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची फसवणूक होत असते कृषी केंद्र असेल पेट्रोल पंप असेल बँक असेल मोबाईल दुकान असेल कापड दुकान असेल असेल अशा सर्व ठिकाणी ग्राहकांच्या आलेल्या तक्रारीवरून त्यांना त्यांची हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जास्त प्रमाणात महिला ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्या जाते सदर हे सर्व प्रकार रोखण्यासाठी काम करणार असल्याचे सौ वर्षा इंगळे यांनी सांगितले. तसेच बुलढाणा जिल्ह्यामध्ये ग्राहकांचे विशेषता महिलांमध्ये जनजागृती सुद्धा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांचे निवडीबद्दल 'विदर्भ अध्यक्ष सचिन खंडारे, विदर्भ पदाधिकारी सुनील अंभोरे, विदर्भ पदाधिकारी डॉ गंगाराम उबाळे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष शालिकराम चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या बुलढाणा महिला जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल वर्षा इंगळे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सुजात आंबेडकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने गरजूंना ब्लँकेट वाटप



अक्कलकोट : वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते आद-रणीय सुजात आंबेडकर साहेब यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने गरजूंना ब्लँकेट वाटप करण्यात आले, सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबवण्यात आला.

सम्यक विद्यार्थी आंदोलन नेहमीच लोकहिताचे आणि सामाजिक उपक्रम राबवत असते आणि भविष्यात असेच सामाजिक उपक्रम सुरूच राहतील असे प्रतिपादन सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे यांनी केले.

याप्रसंगी साहिल कांबळे, महेश बनसोडे, सागर गायकवाड, प्रताप वाघमारे आदी उपस्थित होते.

# ईपीएस ९५ सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अल्प पेन्शनमध्ये वाढ न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : ईपीएस ९५ सेवानिवृत्त १८६ आस्थापना मधील कर्मचारी यांच्या अल्प पेन्शन मध्ये वाढ करावी व कमीत कमी ७५०० रुपये व महागाई भत्ता देण्यात यावा या इतर मागणीसाठी गेली दहा वर्ष संघर्ष करीत असून केंद्र सरकार या वृद्ध सेवानिवृत्त कर्मचाऱ्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. या कडे लक्ष वेधण्यासाठी



कळंब तालुका ईपीएस ९५ सेवानिवृत्त कर्मचारी यांनी कळंब तालुका अध्यक्ष अच्युतराव माने यांच्या नेतृत्वाखाली कळंब तहसील कार्यालयासमोर ठिय्या मारला व तहसीलदार कळंब यांच्या मार्फत केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारमण व केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांना निवेदने पाठवली आहेत. यावेळी अव्वल कारकून विद्या रणदिवे यांनी निवेदन स्वीकारले. या प्रसंगी ईपीएस ९५ सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष अच्युतराव माने,रामभाऊ कवडे, गोकुळदास अडसूळ, गुलाब बागवान, बशीर पठाण, पी.जी. मोदी, बी. एस. डुकरे एस. जे. शेख, प्रकाश भाकरे, यांच्यासह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची उपस्थिती होते.

# उमरगा-लोहारा तालुक्यात रिपाइं (आठवले ) पक्षाने उमरगा येथिल बैठकीत शिव सेना शिंदे गटाकडे दिला युतिचा प्रस्ताव : जि.प. गटाच्या दोन तर प.सं. गणाच्या तिन जागा रिपाइं (आठवले) कडे सोडण्याचे दिले लेखी पत्र

वागदरी/एस. के . गायकवाड : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाइं चे धाराशिव जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उमरगा येथे माजी खासदार तथा शिवसेना शिंदे गटाचे धाराशिव जिल्हा नेते जिल्हा नेते प्रा. रवींद्र गायकवाड सर यांच्या निवासस्थानी उमरगा, लोहारा तालुक्यातील रिपब्लिकन कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली असून या बैठकीत उमरगा लो-हारा तालुक्यात महायुतीचा घटक



पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटा बरोबर रिपब्लिकन पक्ष पक्षाने युती करण्याचा प्रस्ताव दिला असून दोन जिल्हा परिषद गट व तीन पंचायत समिती गणाच्या अशा एकूण पाच जागा उमरगा लोहारा तालुक्यात पक्षाला सोडाव्यात असा लेखी प्रस्ताव राजाभाऊ ओव्हाळ यानी कार्यकर्त्यांच्या सहीनिसी प्रा.रवींद्र गायकवाड सर यांना देण्यात आला.



याप्रसंगी बोलताना शिवसेना शिंदे गट गटाचे धाराशिव जिल्हा नेते प्रा.रविंद्र गायकवाड म्हणाले की देशात आणि राज्यात भाजपा शिवसेना शिंदे गट,रिपाइं (आठवले) व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाच्या महायुतीचे सरकार आहे तेंव्हा धाराशिव जिल्हयात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका ह्या शक्यतो महायुतीच्याच माध्यमातून लढविल्या जाव्यात अशी सक्त ताकीद शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली असून त्यादृष्टीने उमरगा लोहारा तालुक्यात प्रयत्न चालू आहेत जर भाजपाने आपणाला सन्मानपूर्वक वागणूक नाही दिली तर समविचारी मित्रपक्ष म्हणून शिवसेना शिंदे गट व आरपीआय (आठवले)गटाची भूती करून व समविचारी पक्षांना सोबत घेऊन निवडणूक लढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल यामध्ये रिपाइंला चांगल्या प्रकारे न्याय देण्यात येईल.

या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सुभापती शिंदे दाजी, रिवाइं (आठवले) महाराष्ट्र प्रद-ेशा कार्यकारणी सुदस्य एस.के. चेले, धाराशिव जि.प. चे माजी समाज कल्याण सभापती हरीष डावरे, रिपाइंचे मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष आनंद पांडागळे, रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे,दगडू भोसले, जिल्हा सचिव दिगंबर कांबळे, एस. के. गायकवाड, रिपाइं उमरगा तालुका अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड, लोहारा तालुका अध्यक्ष काकासाहेब भंडारे, दिलीप सुरवसे,रिपाइं लेहारा तालुका कार्याध्यक्ष गजेंद्र डावरे,. तालुका उपाध्यक्ष बालाजी माटे,सह उमरगा लोहारा तालुक्यातील इंच्छूक उमेदवार, कामकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी शिव सेना शिंदे गटाचे.उमरगा नगर परिषदेचे नूतन लोकनियुक्त नगराध्यक्ष किरण गायकवाड यांचा रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हळ यांच्या हस्ते तर जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

# माणसातला देव पाहणारे शांतीदूत म्हणजे महेश इंगळे यांचे व्यक्तीमत्व : प्रा. डॉ. शिवराया आडवितोट



श्रीशैल गवंडी/ अक्कलकोट : येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान विश्वस्त संस्थानचे प्रमुख महेश इंगळे यांनीही आपल्या स्वामी सेवेतून स्वामी भक्तांचे व अक्कलकोट करांचे ऋणानुबंध जोपासलं आहे ही बाब स्वामी सेवेच्या हेतूने वंदनीय आहे. या माध्यमातून त्यांना माणसातला देव पाहणारे शांतीदूत म्हणून ख्याती प्राप्त झाली आहे, म्हणून माणसतला देव पाहणारे शांतीदूत म्हणजे महेश इंगळे यांचे व्यक्तीमत्व असल्याचे मनोगत येथील अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलीत खेडगी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य व अक्कलकोट विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. शिवराया अडवितोट यांनी व्यक्त केले. आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान-चे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे हे सलग पाचव्यांदा नगरस-ेवक म्हणून निवडून आल्याबद्दल तेजग्यान फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा देवा मशीनरीजचे मालक संजीव बिराजदार व अक्कलकोट विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष प्रा.शिवराया अडवितोट यांच्या वतीने नगरसेवक महेश इंगळे यांचा शाल, पुष्प-गुच्छ, पुष्पहार देवून सत्कार केला. यावेळी प्रा.डॉ. शिवराया अडवितोट बोलत होते. या प्रसंगी उदगीर येथील प्रा.डॉ. बसवराज येळेगावकर, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील सर, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, बाळासाहेब एकबोटे, रमेश शिंदे, विपूल जाधव इत्यादी उप-स्थित होते.

**तेजग्यान फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा देवा मशीनरीजचे मालक संजीव बिराजदार व अक्कलकोट विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.शिवराया अडवितोट यांच्या वतीने नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार**

विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला सामाजिक संदेश

# कुरुंद बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील कुरूंद येथील बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे १७ वे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी सायंकाळी मोठ्या उत्स-ाहात पार पडले. शाळेच्या प्रांगणात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या स्नेहसंमेलनात समूहनृत्य आणि पथनाट्यातून सामाजिक संदेश देण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक बबन जाधव उपस्थित होते. पहिली




ते नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मोबाईलचे दुष्परिणाम, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, धनगर समाजाचे जीवन, भारतीय सैनिकांचे शौर्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, पाणी वाचवा तसेच 'ऑपरेशन सिंदूर' या विषयांवर समूहनृत्य आणि सामाजिक संदेश देणारे पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी शाळ-ेची उभारणी करताना विविध स्तरांवर करावा लागलेला संघर्ष संस्थापक बी. बी. पाटील यांनी 'माझी जीवनबाग' या कवितेतून प्रभावीपणे मांडला. त्यांच्या या सादरीकरणाला उपस्थितांकडून विशेष दाद मिळाली. कार्यक्रमाला माजी उपसभापती गुरुनाथ जाधव, अ‍ॅड. प्रदीप मते, भाजप भिवंडी ग्रामीण पूर्व मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत गायकर, संजय पटेल, मनोहर भोईर, काशीनाथ तारमळे, डुकले यांच्यासह मुख्याध्यापिका मोनिका मराडे आणि अनामिका पाटील उपस्थित होते. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानांतर्गत तालुक्यात हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकावल्याची माहिती मोनिका मराडे यांनी दिली.